ISSN 2278-8808 SJIF 2014 = 4.889
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# पुणे जिल्ह्यातील आदिवासी विभागातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या समायोजनाचा अभ्यास

**प्रा. शरद हरी विश्वासराव , Ph. D.**

***आदर्श बहुव्यापी शिक्षण व संशोधन महाविद्यालय पुणे***

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना:**

**भारत देशात अनेक धर्म, संस्कृती व भाषा असलेला समाज एकत्र नांदत असला तरी त्याच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासात खूप विविधता आढळते. भारत देशात एका बाजूला शहरी संस्कृतितील समाज खूप पुढारलेला आढळतो तर दुसऱ्या बाजूला अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व अल्पसंख्यांक समाजसामाजिक आर्थिक व दृष्ट्या मागासलेला आढळतो. ही सामाजिक दरी नाहीशी करण्याची जबाबदारी शिक्षणाची आहे.**

**देशाच्या शहरी, ग्रामीण अथवा आदिवासी विभागाच्या विकासात शिक्षणाची भूमिका महत्त्वाची आहे. मनुष्यबळ विकासासाठी शिक्षण ही महत्त्वाची गुंतवणूक आहे हे विकसित व विकसनशील देशांनी मान्य केले आहे. समाजातील दुर्बल घटकांच्या विकासात शिक्षण हा महत्त्वाचा घटक आहे. शिक्षणाद्वारे समाजाच्या विकासाला गती आणता येते. समाजातील वंचित घटकांना ज्ञान, कौशल्य व व्यवसायाची संधी शिक्षणामुळे प्राप्त होते. जीवनाचा स्तर उंचावण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना शिक्षणामुळे अधिक बळकटी प्राप्त होते.**

**भारतीय घटनेच्या 46 व्या कलमांमध्ये "राज्य जनतेतील दुर्बल घटक आणि विशेषतः अनुसूचित जाती अनुसूचित जमाती यांचे शैक्षणिक व आर्थिक हीत संवर्धन विशेष काळजीपूर्वक करील आणि सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण यापासून रक्षणकरील" असे नमूद केले आहे.**

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण** 1986 **मध्ये असे नमूद केले आहे की " देशाच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकासात शिक्षणाची भूमिका महत्त्वाची असून शिक्षण ही वर्तमानातील व भविष्यकाळातील महत्वाची गुंतवणूक आहे ". आतापर्यंत जे शैक्षणिक सुविधांपासून वंचित आहेत त्यांच्या विशेष गरजांवर भर देऊन त्यांना शैक्षणिक संधी उपलब्ध करून देऊन विषमता दूर करण्यावर भर दिलेला आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्पसंख्यांक, शारीरिक अपंग यांना शिक्षणाच्या संधी खात्रीशीर पुरविण्याची गरज व्यक्त केली आहे.**

**भारत देशात एकूण लोकसंख्येच्या** 8.20 % **समाज आदिवासी आहे. हा समाज वर्षानुवर्ष विविध सुविधांपासून वंचित आहे. त्यांचा सर्वांगीण विकास करण्याची जबाबदारी आपणा सर्वांची आहे.**

**एकविसावे शतक हे स्पर्धेचे युग आहे. या स्पर्धेच्या युगात स्वतःचे अस्तित्व निर्माण करावयाचे असेल तर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे शिक्षणाचे उद्दिष्ट असणे अगत्याचे आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करावयाचा असेल तर विद्यार्थ्यांचा ज्ञानात्मक, क्रियात्मक तसेच भावात्मक विकास घडवून आणणे क्रमप्राप्त ठरते. भावात्मक विकासाअभावी यांना सभोवतालच्या परिस्थितीशी व्यक्तींशी नातेवाईकांची जुळवून घेणे शक्य होत नाही मित्र-मैत्रिणींची जुळवून घेणे शक्य होत नाही.**

**व्यक्तीला सर्वांगीण विकास साधताना, समायोजन साधण्यात अनेक अडचणी येत असल्याने व्यक्ती स्वतःशी व इतरांशी जुळवून घेण्यात कमी पडत आहे त्यामुळे मानवी जीवन अस्थिर बनत चालले आहे. समायोजन म्हणजे प्राप्त परिस्थितीत जुळवून घेणे होय. स्व आणि परिस्थिती यामध्ये संवाद निर्माण करणे तसेच परिस्थितीशी योग्य पद्धतीने जुळवून घेणे म्हणजेच समायोजन होय.**

**व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्व विकासामध्ये वाढीच्या अवस्था खूप महत्त्वाच्या असतात. कुमारावस्थेतील मुलांना समायोजन साधताना तारेवरची कसरत करावी लागते. मानसिक वादळ आणि भावनिक तानाच्या या काळात शारीरिक मानसिक व भावनिक स्थित्यंतरे जलद गतीने घडून येत असल्याने मुलांचे किंवा मुलींचे वर्तन अस्थिर बनते व अनेक समस्या निर्माण होतात. त्यामुळे परिस्थितीशी समायोजन साधण्यास त्यांना अनेक अडचणी येतात.**

**समाजातील कुमारावस्थेतील मुलांचे निरीक्षण केले असता असे आढळते की या अवस्थेतील मुले आईवडिलांशी तसेच शिक्षकांशी उद्धटपणे वागतात, त्यांना त्यांच्या कुटुंबीयांशी जुळवून घेण्यास अनेक अडचणी येतात, तसेच वर्गमित्रांसमवेत मतभेद, संघर्ष अगदी टोकापर्यंत जाऊन पोहोचतात. यातूनच अनेक वाईट प्रवृत्तींचा जन्म होतो. अशा प्रवृत्तीतून अनेक वेळा विकृतीही निर्माण होतात. या विकृतींच्या अनेक कारणांपैकी एक प्रमुख कारण म्हणजे विद्यार्थी ज्या परिस्थितीत राहतो त्या परिस्थितीशी त्याला जुळवून न घेता येणे म्हणजे त्याच्यामध्ये समायोजनाचा अभाव असणे होय. म्हणून आज प्रत्येक मुलाचे समायोजन होणे अत्यंत गरजेचे आहे.**

**संशोधनाचे महत्त्व:**

**विद्यार्थ्यांच्या दृष्टीने संशोधनाचे महत्त्व**

- **स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाविषयी माहिती मिळविण्यासाठी.**
- **समायोजित व समायोजित क्षेत्रांची माहिती मिळवण्यासाठी.**
- **स्वतःची बलस्थाने व कमतरता ओळखण्यासाठी.**

**समस्या विधान: पुणे जिल्ह्याच्या आदिवासी विभागातील आश्रमशाळेतील माध्यमिक स्तरातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या समायोजनाचा अभ्यास करणे**

**संशोधन समस्येतील संकल्पनात्मक व कार्यात्मक व्याख्या:**

1) **पुणे जिल्ह्यातील आदिवासी विभाग:**

**संकल्पनात्मक व्याख्या: महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी उपयोजनेत पुणे जिल्ह्यातील नमूद केलेला आदिवासी विभाग (आदिवासी उपयोजना,** 2001).

**कार्यात्मक व्याख्या: आंबेगाव जुन्नर राजगुरुनगर व मावळ तालुक्यातील आदिवासी भाग**

2) **माध्यमिक स्तर:**

**संकल्पनात्मक व्याख्या: महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने ठरवून दिलेल्या निकषानुसार इयत्ता नववी व दहावीहा शालेय शिक्षणातील स्तर म्हणजे माध्यमिक स्तर होय. (माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य पुणे** 13)

**कार्यात्मक व्याख्या:** **पुणे जिल्ह्यातील आदिवासी विभागातील आश्रमशाळेतील माध्यमिक शाळेतीलइयत्ता नववी व दहावीचा शालेय शिक्षणातील स्तर म्हणजे माध्यमिक स्तर होय.**

2) **आदिवासी विद्यार्थी:**

**संकल्पनात्मक व्याख्या:** **आदिवासी विभागातील महाराष्ट्र शासनाने अधीमान्य केलेल्या अनुसूचित जमातीतील शाळेत शिकणारा विद्यार्थी (देवगावकर, एस. जी.)**

**कार्यात्मक व्याख्या:** **जुन्नर, आंबेगाव, राजगुरुनगर व मावळ तालुक्यातील माध्यमिक शाळेत शिकणारा अनुसूचित जमातीतील विद्यार्थी.**

3) **समायोजन:**

**संकल्पनात्मक व्याख्या:** **व्यक्ती स्वतः व परिस्थिती यामध्ये एकात्म नाते निर्माण करण्यासाठी आपल्या वर्तनात सतत बदल करीत असते. ही प्रक्रिया म्हणजेच समायोजन होय (डॉ. दुनाखे** 1994)

**कार्यात्मक व्याख्या:**

**समायोजन:** H.M. Bell **यांच्या समायोजन शोधिका चाचणीतून कौटुंबिक, वैयक्तिक, भावनिक, सामाजिक,या क्षेत्रांच्या संदर्भात मिळणारे प्राप्तांक म्हणजे समायोजन होय.**

**संशोधनाची उद्दिष्टे:**1)**आदिवासी विभागातील माध्यमिक स्तरातील विद्यार्थ्यांच्या (मुले) समायोजनाचे विश्लेषण करणे.** 2)**आदिवासी विभागातील माध्यमिक स्तरातील विद्यार्थिनींच्या (मुली) समायोजनाचे विश्लेषण करणे.**

**संशोधनाची गृहितके:**1) **समतोल व्यक्तिमत्त्वासाठी समायोजन आवश्यक असते.(डॉ. दुनाखे अरविंद** 2010, **व्यावसायिक मार्गदर्शन व समुपदेशन.)**2)**विद्यार्थ्यांना समायोजना बाबत समस्या असतात.(कुंडले म. बा.** 2012,**शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र.)**

**संशोधनप्रश्न:** **पुणे जिल्ह्यातील आदिवासी विभागातील आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या व विद्यार्थिनींच्यासमायोजनाच्या विविध क्षेत्रातील समायोजनाचा स्तर कसा आहे?. याचा शोध घेणे.**

**संशोधनाची व्याप्ती:** **प्रस्तुत संशोधनात**

1) **पुणे जिल्ह्यातील आदिवासी विभागातील आश्रम शाळेतील माध्यमिक स्तरातील सर्व आदिवासी विद्यार्थ्यांचा समावेश केलेला आहे**.

2) **प्रस्तुत संशोधन हे समायोजन या विषयाशी निगडित आहे**.

**संशोधनाची मर्यादा**:

1) **विद्यार्थ्यांचा थकवा कंटाळा अभिरुचि अभिरुचि यावर संशोधकाचे नियंत्रण असणार नाही**.

2) **वारंवार सूचना देऊनही काही विद्यार्थ्यांनी प्रश्नावली अर्धवट सोडली तर त्यावर संशोधकाचे नियंत्रण असणार नाही**.

3) **प्रस्तुत संशोधनात** H.M. Bell **यांच्या समायोजनशोधिका चाचणीद्वारे कौटुंबिक**, **वैयक्तिक**, **भावनिक**, **सामाजिक**,**या क्षेत्रांचा अभ्यास केलेला आहे**

**संशोधनाची परीमर्यादा**: **प्रस्तुत संशोधन**

1)**पुणे जिल्ह्यातील आदिवासी विभागातील आश्रमशाळेतील माध्यमिक शाळातील विद्यार्थ्यां पुरते परीमर्यादित आहे**.

2) **प्रस्तुत संशोधन हे** H.M. Bell **यांच्या समायोजन चाचणी पुरतेपरी मर्यादित आहे**.

**संशोधनाची संशोधनाची कार्यपद्धती**:

**संशोधनपद्धती** : **वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा वापर प्रस्तुत संशोधनासाठी केला आहे**.

**जनसंख्या निश्चिती**: **जुन्नर**, **आंबेगाव**, **राजगुरुनगर व मावळ तालुक्यातील आदिवासी विभागातील माध्यमिक आश्रम शाळेतील माध्यमिक स्तरातील इयत्ता नववी व दहावीतील विद्यार्थी**.

**नमुना निवड**: **प्रस्तुत संशोधनात पुणे जिल्ह्यातील आदिवासी विभागातील प्रत्येक तालुक्यातील एका आश्रमशाळेची निवड करण्याकरता संभाव्यता नियमावर आधारित नमुना निवड पद्धतीचा स्वीकार केला आहे**. **यापद्धतीतील सुगम यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने नमुना निवड करताना लॉटरी पद्धतीचा उपयोग केला**. **या आश्रम शाळेतील माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांची निवड**

**असंभाव्यतेवर आधारित सहेतुक नमुना निवड पद्धतीद्वारे केली आहे. प्रस्तुत संशोधनासाठी** 96 **विद्यार्थी व** 127 **विद्यार्थिनीची निवड केलेली आहे.**

**माहिती संकलनाची साधने**:H.M. Bell **यांची प्रमाणित समायोजन चाचणी.**

**माहिती विश्लेषणाचे साधन: शेकडेवारी.**

**संख्याशास्त्रीय विश्लेषण: समायोजन चाचणीद्वारे मिळालेल्या माहितीचे शेकडेवारी विश्लेषण**

**उद्दिष्ट** 1 : **आदिवासी विभागातील माध्यमिक स्तरातील विद्यार्थ्यांच्या (मुले) समायोजनाचे विश्लेषण करणे**

**सारणी** 1: **विद्यार्थ्यांच्या (मुले) समायोजनाच्या क्षेत्रातील विविध स्तर व विद्यार्थ्यांचे शेकडा प्रमाण**

| समायोजन पातळी | कौटुंबिक समायोजन | शेकडेवारी | भावनिक समायोजन | शेकडेवारी | आरोग्य समायोजन | शेकडेवारी | समायोजन पातळी | सामाजिक समायोजन | शेकडेवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उत्कृष्ट | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | अत्यंत आक्रमक | 7 | 7.3 |
| चांगले | 0 | 0 | 2 | 2.1 | 13 | 13.5 | आक्रमक | 0 | 0 |
| सर्वसाधारण | 25 | 26 | 14 | 14.6 | 24 | 25 | सर्वसाधारण | 82 | 85.4 |
| असमाधानकारक | 48 | 50 | 54 | 56.2 | 40 | 41.7 | उदासीन | 7.3 | 7.3 |
| अत्यंत असमाधानकारक | 23 | 24 | 26 | 27.1 | 19 | 19.8 | अत्यंत उदासीन | 0 | 0 |
| एकूण | 96 | 100 | 96 | 100 | 96 | 100 | | 96 | 100 |
| | | | | | | | | | |

**विद्यार्थ्यांचे (मुले) कौटुंबिक समायोजन: उत्कृष्ट व चांगले कौटुंबिक समायोजन असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या** 0 % **आढळते तर समाधानकारक कौटुंबिक समायोजन असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या** 50% **आढळते.अत्यंत समाधानकारक कौटुंबिक समायोजन असणाऱ्या मुलांची संख्या** 24 % **आढळते॰**

**विद्यार्थ्यांचे(मुले) भावनिक समायोजन:** **उत्कृष्ट भावनिक समायोजन असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या** 0 % **आढळते तर असमाधानकारक भावनिक समायोजन असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या** 56.2 %**आढळते. अत्यंत असमाधानकारक समायोजन असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या** 27.1 % **आढळते.**

**विद्यार्थ्यांचे (मुले)आरोग्य समायोजन:** **उत्कृष्ट आरोग्य समायोजन असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या** 0 % **असून, चांगले आरोग्यसमायोजन असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या** 13.5 %**आढळते. आरोग्य समायोजनअसमाधानकारक असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या** 41.**७**%**आढळते.अत्यंत असमाधानकारक समायोजन असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या** 19.8 % **आढळते.**

**विद्यार्थ्यांचे (मुले)सामाजिक समायोजन:** **विद्यार्थ्यांचेसामाजिक समायोजन अत्यंत आक्रमक असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या** 7.3 % **आढळते. सर्वसाधारण सामाजिक समायोजन असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या** 85.4 % **आढळते. उदासीन सामाजिक समायोजन असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या** 7.3 **टक्के आढळते तर अत्यंत उदासीन या गटात** 0 %**विद्यार्थी आढळतात.**

**उद्दिष्ट** 2 : **आदिवासी विभागातील माध्यमिक स्तरातील विद्यार्थिनींच्या (मुली) समायोजनाचे विश्लेषण करणे**

**सारणी** 2: **विद्यार्थिनींच्या (मुली) समायोजनाच्या क्षेत्रातील विविध स्तरवविद्यार्थिनींचे शेकडा प्रमाण**

| समायोजन पातळी | कौटुंबिक समायोजन | शेकडेवारी | भावनिक समायोजन | शेकडेवारी | आरोग्य समायोजन | शेकडेवारी | समायोजन पातळी | सामाजिक समायोजन | शेकडेवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उत्कृष्ट | 1 | 0.8 | 1 | 0.8 | 1 | 0.8 | अत्यंत आक्रमक | 4 | 3.1 |
| चांगले | 10 | 7.9 | 4 | 3.1 | 33 | 26 | आक्रमक | 0 | 0 |
| सर्वसाधारण | 62 | 48.8 | 24 | 18.9 | 42 | 33.1 | सर्वसाधारण | 109 | 85.9 |
| असमाधानकारक | 40 | 31.5 | 65 | 51.2 | 39 | 30.7 | उदासीन | 13 | 10.2 |
| अत्यंत असमाधानकारक | 14 | 11 | 33 | 26.0 | 12 | 9.4 | अत्यंत उदासीन | 1 | 0.8 |
| एकूण | 127 | 100 | 127 | 100 | 127 | 100 | | 127 | 100 |
| | | | | | | | | | |

**विद्यार्थिनींचे (मुली) कौटुंबिक समायोजन:** उत्कृष्ट कौटुंबिक समायोजन असणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या 0.8 % आढळते तरचांगले कौटुंबिक समायोजन असणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या 7.9 % आढळते. सर्वसाधारण कौटुंबिक समायोजन असणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या 48.8 % आढळते.असमाधानकारक कौटुंबिक समायोजन असणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या 31.5% आढळते.

**विद्यार्थिनींचे(मुली)भावनिक समायोजन:** उत्कृष्ट भावनिक समायोजन असणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या 0.8 % आढळते तरचांगले भावनिक समायोजन असणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या 3.1 % आढळते. असमाधानकारक भावनिक समायोजन असणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या 51.2 % आढळते. अत्यंत असमाधानकारक समायोजन असणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या 26% आढळते.

**विद्यार्थिनींचे(मुली)आरोग्य समायोजन:** उत्कृष्ट आरोग्य समायोजन असणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या 0.8 % असून, चांगले आरोग्य समायोजन असणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या 26% आढळते. आरोग्य समायोजन असमाधानकारक असणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या 30.7 %आढळते. अत्यंत असमाधानकारक आरोग्य समायोजन असणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या 9.4 % आढळते.

**विद्यार्थिनींचे (मुली) सामाजिक समायोजन:** विद्यार्थिनींचे सामाजिक समायोजन अत्यंत आक्रमक असणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या 3.1 % आढळते. सर्वसाधारण सामाजिक समायोजन असणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या 85.9 % आढळते. उदासीन सामाजिक समायोजन असणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या 10.2% आढळते तर अत्यंत उदासीन या गटात 0.8 %विद्यार्थिनींची आढळतात.

**निष्कर्ष:**1) कौटुंबिक, भावनिक व आरोग्यसमायोजन: उत्कृष्ट व चांगले समायोजन असणाऱ्या विद्यार्थ्यांची व विद्यार्थिनींची संख्या,असमाधानकारक व अत्यंत समाधानकारक समायोजन असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या व विद्यार्थिनींच्या संख्येच्या तुलनेत खूप कमी आढळते.

2 सामाजिक समायोजन:अत्यंत आक्रमक, आक्रमक, उदासीन व अत्यंत उदासीन समायोजन असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या व विद्यार्थिनींच्या संख्येच्या तुलनेत, सर्वसाधारण समायोजन असणाऱ्याविद्यार्थ्यांची वविद्यार्थिनींचीसंख्या जास्त आढळते.

**शिफारशी**: 1) **विद्यार्थ्यांना समायोजनाचे महत्व तसेच विद्यार्थी जीवनातील समायोजनाची आवश्यकता पटवून देण्यासाठी उद्‌बोधन वर्गाचे आयोजन करावे**.2) **समायोजनासाठी अध्यापनामध्ये गटकार्य कृती सत्र प्रकल्प पद्धती सहकार्य अध्ययन इत्यादी कार्यक्रमांचा अवलंब करताना प्रत्येक विद्यार्थ्यांच्या कृतीस व विचारास प्राधान्य द्यावे**.

**शैक्षणिक योगदान**: **प्रस्तुत संशोधन आदिवासी विभागातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या व विद्यार्थिनींच्याविविध समायोजन क्षमतांची माहिती उपलब्ध करून देईल**.

**संदर्भ**:

*Best, J. W. and Khan, J. V. (2008). Research in Education.(10th Edition). New Delhi: Prentice Hall.*

*Deogaonkar, S. G. (1992).Tribal Development Plans. Implementation and Evaluation. New Delhi. Concept Publication Company.*

***कुलकर्णी के.वि.** (1996)**.शैक्षणिक मानसशास्त्र. पुणे. श्री विद्या प्रकाशन.***

***घोरमोडे, के. यु. आणि घोरमोडे, कला.**(2007). **भारतातील शैक्षणिक आयोग व समित्या, नागपूर: विद्या प्रकाशन.***

***जगताप, ह. ना.** (1995). **शैक्षणिक मानसशास्त्र. पुणे: अनमोल प्रकाशन.***

***दांडेकर, वा. ना.** ( 1996).**शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र.** (2009-10) **पुणे: श्री विद्या प्रकाशन.***

***महाराष्ट्र शासन , वार्षिक आदिवासी उपयोजना** (2009-10) **पुणे शासकीय फोटो झिंको मुद्रणालय.***